Maharashtra State
Board of Secandary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८ व१७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.: 020- 25705000 E-mail:- secretary.stateboard@gmail. Fax No.: 020-25665807

क्र.रा.मं/संशोधन/3390
पुणे - ४११ ००४
दिनांक-२६/०६/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय** :-कौशल्य सेतू अभियानमधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत.

**संदर्भ**:-१. शासन निर्णय क्रमांकःसंकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३५/एसडी-२ दिनांक २७/०९/२०१८
२. क्र.रा.मं/संशोधन/२४२१ दिनांक ४/५/२०१९ चे पत्र
३. क्र.रा.मं/संशोधन/२७६६ दिनांक २२/५/२०१९ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्च २०१९ च्या इयत्ता १०वी च्या परीक्षेसाठी ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ देणेसाठी संदर्भिय क्र.३ च्या पत्रान्वये दिनांक १०/६/२०१९ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती.

तथापि विभागीय मंडळामध्ये मुदतीनंतरही विद्यार्थी अर्ज सादर करण्यासाठी येत असल्यामुळे ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ मिळण्यासाठीचे अर्ज **दिनांक २९ जून, २०१९ पर्यंत स्विकारण्याबाबत मुदतवाढ** देण्यात येत आहे. त्यानुसार शाळांना कळविण्यात यावे. प्राप्त अर्जांची छाननी करून तपशीलासह राज्य मंडळाकडे सादर करावेत.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर-४१६००४**

**क्र.कोविमं/शाखा माध्यमिक परीक्षा/** 802
**कोल्हापूर-४१६००४.**
**दिनांक:-२८/०६/२०१९**

**प्रति,**
**सर्व मान्यता प्राप्त शाळा प्रमुख,**
**सातारा,सांगली व कोल्हापूर**

**कोल्हापूर विभागीय मंडळातील मान्यताप्राप्त मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, राज्य मंडळाने जा.क्र.रा.मं./संशोधन /३३९० दिनांक २६/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) टान्सफर ऑफ क्रेडिटसचा लाभ मिळणेबाबतचे अर्ज दिनांक २९ जून २०१९ पर्यंत स्विकारणेबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व शाळा प्रमुखानी नोंद घेवून कौशल्य सेतू व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव या कार्यालयाकडे वेळेत सादर करावेत.**

28.06

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**